# अंतकालीन नफा क्र.०१/२०१९ मधील निशाणी २२ वर आदेश

(दिनांक ०७ जुलै, २०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी गैरअर्जदारचे वारस अभिलेखावर घेणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार – फकिरा तुकाराम जाधव यांचा मृत्यु दिनांक २५.०६.२०२१ रोजी बाळापूर, ता. बाळापुर जि. अकोला येथे झालेला असून त्यांच्या मृत्युनंतर त्यांना पत्नी – मिराबाई आणि तिन मुले – राजेश, संतोष व संजय अशी कायदेशिर वारस आहेत. या व्यतिरीक्त मयत फकिरा तुकाराम जाधव यांना कोणतेही वारस नाही. म्हणून सदर अर्ज मंजुर करुन गैरअर्जदारचे वारस अभिलेखावर घेण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर गैरअर्जदार यांच्या प्रस्तावित वारसांना नोटिस काढण्यात आली. त्याअन्वये त्यांचे वारस हजर झाले व त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. त्यांचे असे कथन की, प्रस्तुतचा अर्ज मुदतबाह्य असून कायद्याने चालणारा नाही म्हणून अर्ज नामंजुर करावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाच्या अवलोकनावरुन अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २० नियम १२ अन्वये अंतकालीन नफा मिळणेसाठी प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रकरणाचे कामकाज प्रलंबित असतांना गैरअर्जदार फकिरा तुकाराम जाधव यांचा मृत्यु दिनांक २५.०६.२०२१ रोजी झालेला आहे. त्या संदर्भात अर्जदार यांनी मयत फकिरा तुकाराम जाधव यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारसांना नोटिसची बजावणी झालेली असून ते सदर प्रकरणी विधीज्ञामार्फत हजर झालेले आहे. प्रस्तुत अर्जाला मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारसांनी हरकत नोंदविली असली तरी त्यांनी ते मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारस नाही, ही बाब नाकारलेली नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता असेही दिसून येते की, अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०७.१०.२०२१ रोजी मयत फकिरा तुकाराम जाधव यांच्या मृत्युच्या ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधीनंतर

दाखल केलेला आहे. अर्जदार तर्फे आजरोजी विलंब माफीचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. सदर विलंब माफीचा अर्ज रु.२००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाचे कामकाज सुस्थितीत पार पाडण्यासाठी गैरअर्जदार म्हणून मयत  फकिरा तुकाराम जाधव यांचे वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आ दे श :**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी मयत फकिरा तुकाराम जाधव यांचे वारसांना अभिलेखावर घ्यावे.

३. अर्जात योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Digitally signed by DIPMALA MAHENDRA PATIL
Date: 2023.07.04 02:09:49 +0530

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.

दिनांक :  ०७/०७/२०२३.
ठिकाणः बाळापूर

<table>
<tr><td colspan="3">I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order.</td></tr>
<tr><td>Name of the Court</td><td>:-</td><td>Smt. D. M. Patil<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur</td></tr>
<tr><td>Name of the Stenographer</td><td>:-</td><td>Shaikh Rafique Shaikh Rasheed</td></tr>
<tr><td>Date of Decision</td><td>:-</td><td>07/07/2023</td></tr>
<tr><td>Order signed by P.O on</td><td>:-</td><td>07/07/2023</td></tr>
<tr><td>Order uploaded on</td><td>:-</td><td>07/07/2023</td></tr>
</table>